
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. 8240

# चिमण चारा



शान्ता ज. शेळके

IRBK-0108240
IRBK-0108240

# चि म ण चा रा

शान्ता ज. शेळके

IRBK-0108240

IRBK-0108240

श्या म ल प्र का श न

किंमत ऐंशीं नये पैसे

एकमेव विक्रेते

आदर्श बुक डेपो, मुंबई २८

# प्रास्ताविक

छोटया मुलामुलींसाठीं मीं लिहिलेल्या कांहीं कविता ‘ चिमणचारा ’ पुस्तकांत एकत्र केल्या आहेत. हा ‘ चिमणचारा ’ बालवाचकांच्या हातीं देतांना मला फार आनंद वाटत आहे. माझ्या चिमुकल्या मित्रमैत्रिणींना या कविता आवडतील अशी मी आशा करतें.

महाराष्ट्र सरकारनें या पुस्तकाला पारितोषिक देऊन मला जें प्रोत्साहन दिलें त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहें.

येथील एक तरुण होतकरू चित्रकार श्री. चन्द्रकान्त ठाकूरदास यांनीं या पुस्तकांतील चित्रें मोठया हौसेनें काढलीं. त्यांचे मी आभार मानतें.

‘ संगम प्रेस ’ चे श्री. माधवराव पटवर्धन यांनीं पुस्तकाची आकर्षक सजावट व सुबक छपाई केली व ‘ श्यामल प्रकाशन ’ नें तें प्रकाशित केलें. या उभयतांची मी मनापासून आभारी आहें.

दि. २५ नोव्हेंबर, १९६०<br>
दादर, मुंबई


—शांता ज. शेळके

# कवितांचा अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | चिऊ चिमणी | १ |
| २. | बाळ | २ |
| ३. | ससा | ३ |
| ४. | पाढे | ४ |
| ५. | कोंबडा | ५ |
| ६. | सकाळ | ७ |
| ७. | राघु भरारी | ८ |
| ८. | आली दिवाळी ! | ९ |
| ९. | मनी मांजरी | १० |
| १०. | चांदूमामा | ११ |
| ११. | बाळ माझें गुणी | १२ |
| १२. | मोत्या आणि मनी | १३ |
| १३. | आला पाऊस, आल्या धारा ! | १५ |
| १४. | माझी होडी | १७ |
| १५. | नट्टापट्टा | १९ |
| १६. | तक्रार | २१ |
| १७. | झाली संध्याकाळ | २३ |
| १८. | देवराया | २५ |

# १

# चिऊ चिमणी




चिऊ चिमणी
आली अंगणीं

बघा हळूंच
मारते चोंच !

दाणा टिपते
नाचनाचते,

चिंवचिंवते
किलबिलते !

वाजवूं टाळी ?
अरे, पळाली !



# २

## बाळ




बाळ आमचें छान
गोरें गोरें पान

केस मऊ काळे
काळे काळे डोळे

गुलाबाचे गाल
ओठ लाल लाल

बाळ आमचें हंसलें
दोन दांत दिसले !



## ३ ससा

चिमुकला ससा माझा
गोरा गोरा पान
कापसाचें अंग याचें
मऊ मऊ छान !

दोन पायांवर बसे
सांवरून तोल
टकमक बघतात
डोळे लाल गोल

कानोसा घे उभारून
मोठे मोठे कान
लुबु लुबु खातो कसा
गवताचें पान !

भितरा हा भारी पण
लावूं नका हात
दचकून नाहीं तर
पळेल बिळांत !

# ४ पाढे



एक दोन
पाहूं पाढे म्हणतो कोण ?

तीन चार
बाळू अमुचा फार हुषार

पांच सहा
पाढे भरभर म्हणे पहा

सात आठ
ओ हो ! याला सारें पाठ

नऊ दहा
खाउ देउं या बाळुस हा !

# ५ कोंबडा

डोईवर हलतो
तुरा छान तांबडा
सकाळींच उठून
आरवतोय कोंबडा



कोंबडेदादाचा
काय तरी थाट
पिसाऱ्याचा झोक
मान कशी ताठ !

कुकूच कूं
कुकूच कूं
काय म्हणतो कोंबडा
चला तरी ऐकूं !

कोंबडा म्हणतो
सकाळ झाली
सोनेरी उन्हें
अंगणांत आलीं

कोंबडा म्हणतो
आळस खोटा
अंथरूण सोडून
झटकन उठा !

कोंबडेदादा
उठतेंच रे मी
तोंड धुऊन कामाला
लागतेंच रे मी !





## ६ सकाळ

सकाळ झाली, काळोख सरे
दिशादिशांत उजेड भरे

रानपांखरें भूर चाललीं
उंच आभाळीं उडूं लागलीं

बागेंत कळी उघडी डोळे
हिरवें पान ऐटींत डोले


सकाळ झाली, ऊन सोनेरी
चढून आलें पायरीवरी

गाय आनंदें कशी हंबरे
गोड दुधानें चरवी भरे

सकाळ झाली, उठले सारे
झोंपून मीच राहूं कां बरें ?

७


# राघु भरारी




अंगावरती हिरवी शाल
चोंच खुलतसे लालंलाल
पिंजरा याचा छान महाल
डाळिंबाचे दाणे लाल!

पेरू मिर्ची डाळ चण्याची
आवड भारी या खाण्याची
दांडीवरती झोंके घेतो
मान वांकवुन शीळ घालतो

'मिठू मिठू'चें मंजुळ गाणें
खुषींत येऊन कधीं नाचणें
असा गुणाचा राघु भरारी
आवडतो तो मजला भारी






## ८ आली दिवाळी

आली दिवाळी आली दिवाळी
चला शाळेला सुटी मिळाली
घालील आई सडारांगोळी
लावील दादा दिव्यांच्या ओळी

आली दिवाळी आली दिवाळी
उटणीं लावूं, करूं आंघोळी
केशरी गंध खुलेल भाळीं
नवे कपडे, नवी झळाळी !

आली दिवाळी, आली दिवाळी
खाण्यापिण्याची चंगळ झाली
लाडू, करंज्या, शंकरपाळीं
खाऊं चिरोटे, शेव, कडबोळीं

आली दिवाळी, आली दिवाळी
फटाक्यांनीं ही दणाणे आळी
भाऊबीजेची मौज आगळी
देऊं ताईला खणाची चोळी !



# ९

# मनी मांजरी

मनी मांजरी
मैत्रीण ही दिसे माझी किती गोजिरी !

डोळे घारोळे
नाक हिचें नकटें नि दांत फारोळे

पांढरें अंग
तगरीच्या फुलांचा कां चोरीला रंग ?

मऊ ही जरी
मखमली पंजांमध्यें नखें टोंकेरीं !

खाते ही काय ?
लपलप चाटी दुधावरची साय

घुरघुरते
चुलीवर दुपारीं ही झोंपा काढीते

रात्रींच्या वेळीं
डोळ्यांतून बॅटरी कां लाविते निळी ?

मनी मांजरी
आवडते किती मला पोर गोजिरी !

## १० चांदूमामा



चांदूमामा चांदूमामा भागलास का ?
लिंबोणीच्या झाडामागें लपलास का ?
पानापानांतून कसा पुढें पळसी ?
थांब ना रे जरा तरी, बोल माझ्याशीं

चांदूमामा चांदूमामा गोरा तुझा रंग
चांदण्याच्या दुधानें का धुतोस तूं अंग ?
कधीं कधीं दिसतोस गरगरीत गोल
रोड रोड पुन्हां कसा होतोस, बोल ?

चांदूमामा चांदूमामा आवडतोस भारी
ये ना उतरून खालीं, ये माझ्या घरीं,
देइन तुला दूधभात, देइन तुला पुरी,
छान छान खेळणींही देइन तुला सारीं

चांदूमामा चांदूमामा खेळ माझ्यासंगें
उडूं, बागडूं, खूप खूप मजा करूं दोघे...
अरे ! चांदूमामा तर ढगाआड गेला
लबाडानें कसें बघा फसवलें मला !

## ११
## बाळ माझें गुणी



बाळ माझें गुणी
बघूं नका कुणी

गुलाबाचें फूल
कानांमध्यें डूल

गोरा गोरा रंग
खेळण्यांत दंग


किती पडूं झडूं
डोळां नाहीं रडूं

शहाणें ग बाई
करी गाई गाई

दृष्ट होईल याला
भय वाटे मला

काजळाचें बोट
गालीं लावूं तीट

गुणी माझें बाळ
देवा ! तूं सांभाळ !



## १२

# मोत्या आणि मनी


मोत्या वसतो ओटीवरतीं
मनी चुलीवर उबेंत लोळे
मोत्या राखण करी जागुनी
मनी झोंपते मिटुनी डोळे

ओटीवर मोत्याचें जेवण
मनी बैसते पानाजवळीं
मोत्या बैसे दूर अदबिनें
मनीस ताई पण कुरवाळी

‘ मोत्या मोत्या ’ हांक मारतां
मोत्या येई दुरुनी धांवत
पहा मनीला पण बोलावुन
मान फिरवुनी जाइल ऐटिंत

मोत्या आहे जरी शहाणा
आइ न त्याला घरांत घेई
मनी झोंपते अंथरुणांतहि
राग तिचा पण कुणा न येई

लठ्ठ गोरटी दूधचोरटी
मनी असे मुलखाची लुच्ची
मोत्या भोळा परी इमानी
खरी घरावर माया त्याची !



# १३ आला पाऊस आल्या धारा




आला पाउस आल्या धारा !

लोट धुळीचे वरवर चढती
सुकलीं पानें त्यांत गिरकतीं
अंग घुसळुनी झाडें डुलती
थंडगार किति सुटला वारा
आला पाउस, आल्या धारा !

सूर्य बसला कोठें दडुनी ?
काळे ढग हे आले कुठुनी ?
उंट कुणी, तर हत्ती कोणी
मधुन विजेचा ये चमकारा
आला पाउस, आल्या धारा !

लपति पांखरें घरट्यांमधुनी
बसे मांजरी चुंडू करुनी
गाय हुंगते नाक फुगवुनी
खुषींत येउन चाटि वासरा
आला पाउस, आल्या धारा !

पाउस तिरपा ये सडसडुनी
टपटप पडती थेंब अंगणीं
जिकडे तिकडे पाणिच पाणी
चिमणी घे वळचणिस निवारा
आला पाउस, आल्या धारा !

पागोळ्यांतुन मोती गळती
समुद्र उसळे दारापुढती
होड्या सोडूं भरभर वरतीं
जाऊं वल्हावित दूर बंदरा
आला पाउस, आल्या धारा !





# १४ माझी होडी

माझी होडी किती गंमतीची
होडी माझी किति मौजेची !

शुभ्र पांढरा साधा कागद
घड्या घालुनी उघडा अलगद
क्षणांत झाली तयार होडी
नको सुकाणूं वा नावाडी


होडिंत माझ्या ऐटींत बसुनी
समुद्र जाइन मी ओलांडुनि
दूरदूरचे पाहिन देश
नाना जाती, नाना वेष

खाउ, खेळणीं, कपडे उंची
आणि पुस्तकें नवलपरीचीं
होडी भरुनी आणिन माल
पाहुन सारे थक्कच व्हाल !

ये ये आई, ये ये ताई
या हो बाबा, ये रे भाई
पाउल टाका जपून सारे
होडीवरतीं हळूं चढा रे


किति गंमतीची माझी होडी
आणि तियेचा मी नावाडी
हवें तिथें मी तुम्हांस नेइन
जगांत साऱ्या फिरवुन आणिन

हांसतेस तूं कां ग आई --
मान फिरवुनी ? जा ! मी नाहीं !



# १५

# नट्टापट्टा



साळीदादा, साळीदादा,
एवढें माझें ऐकशील का ?
जरीचा कांठ
बुट्ट्यांचा थाट
साडी निळी मला विणशील का ?

सोनारदादा, सोनारदादा,
एवढें माझें ऐकशील का ?
घुंगरांची रुणझुण
सांखळीची किणकिण
कंबरपट्टा मला घडशील का ?





माळीदादा, माळीदादा,
एवढें माझें ऐकशील का ?
चांफ्याची कळी
शेवन्ती पिंवळी
गजरा मला गुंफशील का ?

कासारदादा कासारदादा
एवढें माझें ऐकशील का ?
सोनसळी अंग
लाल लाल रंग
बांगड्या मला भरशील का ?





करीन मग मी नट्टापट्टा
साडी नेसेन चटाचटा
कमरेला घालीन कंबरपट्टा
वेणींत गजरा पिंवळाधमक
हातांत चुडा लालभडक
लोक बघतील टकमक टकमक !



# १६




चड्डीसद्ऱ्यावांचून
मोत्या फिरे उघडाच
‘ घाल कपडे ’ म्हणून
कां ग आग्रह मलाच ?

अंग चाटून नुसतें
साफ करी मनूताई
माझ्याच कां मागें तुझी
आंघोळीची सदा घाई ?


झाडांवर पांखरांचें
चाले मजेंत जेवण
मला मात्र सतावीसी
‘ घांस नीट घे ’ म्हणून !

म. फ. सं. ठाणे, वाचनालय
दा. क्र. नों.
वि. क्र.

धूमधार पावसांत
फुलें भिजती खुशाल
आम्ही बसतों घरांत--
असे चालतात हाल !

'इथें तिथें नको जाऊं'
सदा सांगसी आम्हांला
आहे मोकळीक सारी
मनी, मोत्या, पांखराला !

जाऊं उडून आभाळीं ?
बसूं वेलीच्या टोंकाशीं ?
होऊं फूल ? मनी ? मोत्या ?
कां ग नुसती हंसशी ?



# १७ झाली संध्याकाळ

झाली संध्याकाळ
पुरे आतां खेळ
जाऊं या घरांत
केली सांजवात

हातपाय धुऊं
गुंफूं फूलहार
वाहून देवाला
करूं नमस्कार




ओटीवर आतां
परवचा म्हणूं
श्लोक, गोड गाणीं,
जरा गुणगुणूं

झाली संध्याकाळ
सुटे मंद वारा
निळ्या आभाळांत
चमकती तारा

झाली संध्याकाळ
फुलले मोगरे
वाऱ्यांतून गोड
गंध दरवळे

सांजेच्या या वेळीं
अंगणीं बसून
गुजगोष्टी बोलूं
जराशा हंसून

डोकावून आई
बघेल आंतुनी
म्हणेल कीं " बाळें
किती हीं शहाणीं ! "





# १८

# देवराया

देवराया आम्ही सारीं तुझीं मुलें
तुझ्या बागेमध्यें फुललों हीं फुलें

मायबाप तूंच तूंच खेळगडी
सांभाळीसी आम्हां तूंच घडीघडी

तुझे चंद्रसूर्य तुझेच हे तारे
फुलें पांखरें हीं तुझें जग सारें

चालवीसी आम्हां धरूनीया हात
चोहींकडे डोळे तुझे पाहतात

तुझाच रे देवा आम्हांला आधार
देवराया तुला नमूं वारंवार !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
क्र. ........ नों. दि ........
वि ........ ........ क्र. ........

IRBK-0108240

: प्रकाशक :
**ल. मो. प्रभुणे**
इब्राहिम बिल्डिंग,
तुळशी पाईप रोड, दादर
मुंबई २८

: मुद्रक :
**मा. ह. पटवर्धन**
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३, नारायण पेठ,
पुणें २

श्यामल प्रकाशन : १

पुढील प्रकाशनें

१) मैना (कादंबरी)

२) बाज्याची बहादुरी (कथासंग्रह)

एकमेव विक्रेते

आदर्श बुक डेपो

न. चि. केळकर पथ

दादर . मुंबई २८